# वजाबाकीने कमी करूया






५ – ३ = ☐

क्षितिजकडे ५ कप होते. त्याने आचलला ३ कप दिले. आता क्षितिजकडे किती कप उरले ?

| एकक | |
|---|---|
| ५ | क्षितिजकडचे कप |
| – ३ | आचलला दिलेले कप |
| | क्षितिजकडे उरलेले कप |

## जोड्या लावून वजाबाकी.

- आकाशकंदील ८ व पणत्या ४ आहेत. पणत्यांपेक्षा आकाशकंदील किती जास्त आहेत ?




$$\begin{array}{r} 8 \\ -\ 4 \\ \hline 4 \end{array}$$

(८ – ४ = ४)

पणत्यांपेक्षा ४ आकाशकंदील जास्त आहेत.

- ६ पाट्या व ११ पुस्तके आहेत, पुस्तकांपेक्षा पाट्या किती कमी आहेत ?



☐ – ☐ = ☐

पुस्तकांपेक्षा पाट्या ☐ कमी आहेत.

- ८ स्ट्रॉबेरी आणि ६ डाळिंबे आहेत. स्ट्रॉबेरी किती जास्त आहेत हे संख्यांची वजाबाकी करून ठरवू.

८ – ६ = २

म्हणून डाळिंबांपेक्षा २ स्ट्रॉबेरी जास्त आहेत,
किंवा स्ट्रॉबेरीपेक्षा २ डाळिंबे कमी आहेत.


## वजाबाकी मागे मोजून

पुढे दिलेला खेळ तुम्ही खेळून पाहा.

माझ्याकडे हा तक्ता आहे. यावर ४९ ठोकळे ठेवूया. एकावेळी ५ किंवा ५ पेक्षा कमी ठोकळे उचलायचे. प्रत्येक वेळी १ संधी देऊ, पण शून्य ठोकळे उचलता येणार नाहीत.

ज्याला शेवटचा ठोकळा उचलावा लागतो, तो हरतो.

रमाने खेळाची सुरुवात केली. तिने ४९ पासून मागे मोजून चार ठोकळे उचलले. उरले ठोकळे ४५. आता यश ठोकळे उचलणार आहे. याप्रमाणे खेळत शेवटचा ठोकळा यशने उचलला, म्हणून रमा जिंकली.



| प्रथम होते | | घेतले | | उरले |
|---|---|---|---|---|
| ४९ | – | ४ (रमा) | = | ४५ |
| ४५ | – | ५ (यश) | = | ४० |
| ४० | – | ५ (रमा) | = | ३५ |
| ३५ | – | ४ (यश) | = | ३१ |
| ३१ | – | ३ (रमा) | = | २८ |
| २८ | – | ५ (यश) | = | २३ |

| प्रथम होते | | घेतले | | उरले |
|---|---|---|---|---|
| २३ | – | ५ (रमा) | = | १८ |
| १८ | – | ५ (यश) | = | १३ |
| १३ | – | ५ (रमा) | = | ८ |
| ८ | – | ४ (यश) | = | ४ |
| ४ | – | ३ (रमा) | = | १ |
| १ | – | १ (यश) | = | ० |

सुरेश आणि रमेशने दिवाळीसाठी भेटकार्डे करण्याचे ठरवले. त्यासाठी साहित्य आणायचे होते. सुरेशजवळ ९ रुपये होते. रमेशने काही रुपये आणले. दोघांचे मिळून १४ रुपये झाले. रमेशने किती रुपये आणले ?


रमा : म्हणजे १४ मधून ९ वजा करायचे.

यश : मी १४ वर्तुळे काढली. त्यांतील ९ वर्तुळांवर काट मारली. आता ५ वर्तुळे उरली म्हणजे रमेशने ५ रुपये आणले.


रमा : मी ९ च्या पुढे १४ पर्यंत ओळीने संख्या मोजल्या, त्या ५ आहेत. माझेही उत्तर ५ आहे.

**कोणाची मोजणी सोपी आहे यावर वर्गात चर्चा करा.**

वजाबाकी करताना संख्यारेषेचा उपयोग करून मागे किंवा पुढे मोजून देखील वजाबाकी करता येते. १४ − ९ हीच वजाबाकी पाहा. ९ + [ ५ ] = १४ म्हणून १४ − ९ = ५




१४ − ९ = [ ५ ]




वरील पहिल्या आकृतीत ९ पासून १४ पर्यंत उजवीकडे ५ उड्या झाल्या; दुसऱ्या आकृतीत १४ पासून ९ उड्या डावीकडे मारल्या, ५ वर उड्या थांबल्या; दोन्ही कृतींमध्ये उत्तर ५ हेच आले. दोन्ही प्रकारांनी संख्यारेषेवर वजाबाकी करता येते. याचा सराव करण्यासाठी खालील वजाबाक्या कर.

| | | |
|---|---|---|
| (१) १२ − ८ = [ ] | (२) ३२ − १ = [ ] | (३) १५ − १० = [ ] |
| (४) ४३ − २ = [ ] | (५) १३ − ११ = [ ] | (६) ३९ − ३ = [ ] |
| (७) २० − १८ = [ ] | (८) ४४ − ४० = [ ] | (९) ११ − २ = [ ] |

४३ − २ ही वजाबाकी करताना २ पासून ४३ पर्यंत उजवीकडे उड्या मोजणे सोपे की ४३ च्या डावीकडे २ उड्या मारणे सोपे ?

४४ − ४० ही वजाबाकी करताना ४४ पासून ४० उड्या डावीकडे मारणे सोपे की ४० च्या उजवीकडे ४४ पर्यंतच्या उड्या मोजणे सोपे ?

PD3HZH